# मेट्रो-३च्या रुळ बांधणीचे काम लार्सन अॅण्ड टुब्रो कंपनीला

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) अंतर्गत बीकेसी ते कफ परेड स्थानकांदरम्यान मेट्रो रुळांच्या बांधणी करण्याचे कंत्राट लार्सन अॅण्ड टुब्रो कंपनीला देण्यात आले आहे. अपलाईन तसेच डाऊनलाईन मिळून ४७ किमी रूळ बांधण्यात येणार आहे. या कंत्राटाअंतर्गत रूळ उभारणी संदर्भातील सर्व कामे जसे की उत्तम दर्जाच्या रुळांची खरेदी आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग इत्यादी कामांचा समावेश असणार आहे. या कामाअंतर्गत हाय अँट्युनेशन ट्विन ब्लॉक स्लीपर या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे. भारतात प्रथमच मुंबई मेट्रो ३ प्रकल्पात या तंत्रज्ञानाचा वापरण्यात आला असल्याचे मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याप्रसंगी मुं.मे.रे.कॉ. चे प्रकल्प संचालक व प्रभारी व्यवस्थापकीय संचालक सुबोध गुप्ता म्हणाले, या प्रकल्पासाठी ट्रॅक एक महत्वाचा घटक आहे. मेट्रो-३मार्गिकेवरील ऐतिहासिक वारसा इमारती असल्या कारणाने अत्याधुनिक ट्रॅक यंत्रणा आम्ही या प्रकल्पासाठी वापरणार आहोत ज्यामुळे कंपने व ध्वनीचा प्रभाव जाणवणार नाही. याशिवाय प्रवाशांना सुखकर प्रवासाचा अनुभव घेता येईल.